नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
संपादक : कमलाकर सोनकांबळे
YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - २४३ Issue - 243 | वार गुरुवार दि. २२ जानेवारी २०२६ Blow- Thursday Date 22 January 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# २९ महानगरपालिकांच्या महापौरपदासाठी आज आरक्षणाची सोडत जाहीर होणार; संपूर्ण राज्याचे लक्ष

## मुंबईच्या महापौरपदासाठी आज चक्राकार पद्धतीने आरक्षण सोडत काढण्यात येणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील २९ महानगरपालिकांच्या महापौरपदासाठी आज आरक्षणाची सोडत जाहीर होणार असून, संपूर्ण राज्याचं लक्ष मंत्रालयाकडं लागलं आहे. नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्या उपस्थितीत सकाळी ११ वाजता मंत्रालयातील सहाव्या मजल्यावर या सोडतीला प्रारंभ होणार आहे. ५० टक्के महिला आरक्षणाचे नियम लागू केल्याने राज्यातील १५ महापालिकांवर महिला राज असणार आहे, तर १४ ठिकाणी सर्वसाधारण वर्गाला संधी मिळणार आहे. महिलांना असलेल्या ५० टक्के आरक्षणानुसार, ४ महापालिकांमध्ये ओबीसी महिला, तर ९ महापालिकांमध्ये खुल्या प्रवर्गातील महिलांसाठी आरक्षण लागू होणार आहे दरम्यान आरक्षण सोडतीनंतरच कोणत्या शहरात ओबीसी महिला, खुल्या प्रवर्गातील महिला किंवा अनुसूचित जाती-जमातीचे आरक्षण असेल, हे स्पष्ट होणार आहे.

मुंबईच्या महापौरपदासाठी आज चक्राकार पद्धतीने आरक्षण सोडत काढण्यात येणार आहे. गेल्या वेळी या पदासाठी अनुसूचित जाती महिला आणि खुला प्रवर्गासाठी आरक्षण पडले होते. त्यामुळे कुठल्या आरक्षणाचे पक्षनिहाय किती नगरसेवक विजयी झाले आहेत, याचा लेखाजोखा राजकीय पक्ष तयार करत आहेत. आरक्षण निश्चित झाल्यानंतर महापौरपदासाठी कुणाला संधी देता येईल, याबाबतच्या हालचालींना वेग येणार आहे. राज्य शासनाच्या विभागामार्फत महापौरपदासाठी आरक्षणाची सोडत नगरविकास मंत्रालयात गुरुवारी सकाळी ११ वाजता काढली जाणार आहे. या प्रक्रियेकडे सर्वच राजकीय पक्ष, इच्छुक नगरसेवकांचे लक्ष लागले आहे. आरक्षण कोणत्या प्रवर्गासाठी निघणार यावर इच्छुकांचे राजकीय भवितव्य अवलंबून आहे.

# आशियातील सर्वात मोठा विकेंद्रित सौर ऊर्जा कार्यक्रम राबवून महाराष्ट्राने रचली यशोगाथा

दावोस : महाराष्ट्राने आशियातील सर्वात मोठा विकेंद्रित सौर ऊर्जा कार्यक्रम राबवून यशोगाथा रचली आहे, असे नमूद करून या वर्षाच्या अखेरपर्यंत १६ गिगावॅट वीज सौर ऊर्जेच्या माध्यमातून उपलब्ध होईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

वर्ल्ड ईकॉनॉमिक फोरमच्या वार्षिक बैठकीच्या निमित्ताने इंडिया पॅव्हेलियनमध्ये इंटरनॅशनल सोलर अलायन्सच्या वतीने आयोजित 'स्केलिंग सोलर एनर्जी व्हेअर इट मॅटर' या विषयावर मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी मांडणी केली. यावेळी केंद्रीय नवीन आणि नवीकरणीय ऊर्जा मंत्री प्रल्हाद जोशी आदी मान्यवर उपस्थित होते.

### सौर ऊर्जेच्या माध्यमातून वर्षअखेरपर्यंत १६ गिगावॅट वीज निर्मिती : मुख्यमंत्री

मुख्यमंत्री फडणवीस यांनी रूफटॉप सोलर, सौर पंप, अब्जावधींची वीजखर्च बचत, कार्बन उत्सर्जनात मोठी घट, तसेच सौरऊर्जा, बॅटरी स्टोरेज आणि पंप स्टोरेजद्वारे भविष्यात राज्य व राष्ट्रीय वीज ग्रीड स्थिर करण्याच्या योजनांची माहिती दिली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, महाराष्ट्राने दशकापेक्षा कमी काळात संपूर्ण ऊर्जा क्षेत्राचा चेहरामोहरा बदलून टाकला आहे. महाराष्ट्रातील वीज ग्राहकांमध्ये १० टक्के हे कृषि पंपधारक आहेत, जे एकूण विजेच्या ३०% वीज वापरत होते. त्यांना वीज पुरवठा करण्याचा खर्च प्रति युनिट ८ रुपये होता, तर त्यांच्याकडून फक्त १ रुपया आकारला जात असे. उर्वरित ७ रुपये राज्याकडून किंवा 'क्रॉस सबसिडी'च्या स्वरूपात दिले जात होते, ज्यामुळे औद्योगिक आणि इतर ग्राहकांसाठीच्या विजेच्या दराचा भार वाढत होता. हे एक दुष्टचक्र होते. मात्र, प्रधानमंत्री नरेंद्र मोदीजींच्या दूरदृष्टीने आम्ही शेतीचा संपूर्ण वीज भार सौर ऊर्जेवर हलवण्याचा निर्णय घेतला. आशियातील सर्वात मोठी 'विकेंद्रित सौर ऊर्जा योजना' सुरू केली. याद्वारे प्रत्येक कृषी फिडर स्वतंत्रपणे सौरऊर्जेवर आणला गेला. शेतकऱ्यांना वीज पुरवण्यासाठी आम्ही स्वतंत्र कंपनी स्थापन केली. आता या वितरण प्रणालीद्वारे सुमारे १६ गिगावॅट वीज निर्माण केली जाईल आणि या वर्षाच्या अखेरीस आम्ही हा प्रकल्प पूर्ण करू. हे काम प्रगतीपथावर आहे. आम्ही दरमहा सुमारे ५०० मेगावॅट समर्पित करत आहोत आणि लवकरच १ गिगावॅट वीज निर्मिती पर्यंत पोहोचू. या दरम्यान, शेतकऱ्यांना वीज पुरवठ्याचा जो खर्च ८ रुपये होता, तो आता ३ रुपयांपेक्षा कमी झाला आहे. यामुळे उद्योग आणि घरगुती ग्राहकांवरील खर्चाचा बोजा कमी झाला असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

महाराष्ट्रात 'पीएम सूर्य घर योजना' उत्तमरित्या राबविली जात आहे. यातून सुमारे ४ गिगावॅट क्षमतेचे रूफटॉप सोलर संयत्र कार्यान्वित होणार असल्याचे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले,



यातून आता केवळ घरा-घरासाठी वीज मिळते आहे, असे नाही, तर ती प्रकाशाने उजळून निघताहेत. शिवाय यातून शिल्लक वीज ग्रीडलाही पुरवली जात आहे. यामुळे कार्बन उत्सर्जनाचे प्रमाण कमी होऊ लागले आहे. आम्ही आता केंद्र कृषि पंपाच्या नवीन जोडण्यांसाठी केंद्र सरकारच्या योजनेच्या धर्तीवर ' मागेल त्याला सौर पंप' योजना सुरू केली. यात संपूर्ण भारतात जेवढे सौर पंप बसवले आहेत, त्यापैकी ६०% महाराष्ट्रात आहेत. लवकरच ही संख्या १० लाखांच्या पार जाईल. याचा परिणाम असा झाला आहे की, पुढील ५ वर्षांसाठी आमचा 'मल्टी-इयर टॅरिफ' (विजेचे दर), जो दरवर्षी ९% ने वाढत होता, तो आता कमी होत आहे. पुढील ५ वर्षांत आम्ही वीज खरेदीच्या खर्चात १० अब्ज डॉलर्सची बचत करू, असेही त्यांनी सांगितले.

सौरऊर्जा कार्यक्रमामुळे होणारी कार्बन उत्सर्जन कपात ही ३०० कोटी झाडे लावण्याइतकी असल्याचे सांगून मुख्यमंत्री म्हणाले की, २०३२ पर्यंत आम्ही आणखी ४५ गिगावॅट वीज निर्माण करू, ज्यापैकी ७०% सौर ऊर्जा असेल. ३-४ वर्षांपूर्वी आमचे नूतनीकरणक्षम ऊर्जेचे प्रमाण १३% होते, जे २०३० पर्यंत ५२% होईल. ग्रीड स्थिर करण्यासाठी आम्ही बॅटरी स्टोरेज आणि पश्चिम घाटातील भौगोलिक परिस्थितीचा फायदा घेत 'पंप स्टोरेज' प्रकल्पांवर भर देत आहोत. आम्ही ८०,००० मेगावॅट क्षमतेचे पंप स्टोरेज प्रकल्प सुरू केले आहेत, जे लवकरच एक लाख मेगावॅटपर्यंत पोहोचतील, असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

### भारताच्या ७७ व्या प्रजासत्ताक दिनी जिल्ह्यांमध्ये पालकमंत्री व मंत्री करणार ध्वजवंदन

मुंबई : भारताच्या ७७ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त २१ जानेवारी २०२६ रोजी ध्वजवंदनाचा मुख्य शासकीय समारंभ राज्यभर एकाच वेळी सकाळी ९.१५ वाजता आयोजित करण्यात येणार आहे. या मुख्य शासकीय समारंभात निमंत्रितांना सहभागी होता यावे यासाठी या दिवशी सकाळी ८.३० ते १० या दरम्यान ध्वजवंदनाचा किंवा इतर कोणताही शासकीय किंवा अर्ध शासकीय समारंभ आयोजित करण्यात येऊ नये. जर एखाद्या कार्यालयास अथवा संस्थेला आपला स्वत:चा ध्वजवंदन समारंभ करावयाचा असल्यास त्यांनी तो समारंभ सकाळी ८.३० च्या पूर्वी किंवा १० वाजेनंतर करावा, असे राजशिष्टाचार विभागामार्फत परिपत्रकाद्वारे कळविण्यात आले आहे.

### टी-२० वर्ल्डकपआधी नागपूरात टीम इंडियाचे शक्तिप्रदर्शन!

# पहिल्या टी-२० सामन्यात न्यूझीलंडचा फडशा पाडला, मालिकेत १-० ने आघाडी

नवी दिल्ली : टी-२० वर्ल्डकपचा बिगुल वाजण्यापूर्वी भारतीय संघाची टी-२० क्रिकेटमध्ये विजयाची मालिका सुरू आहे. न्यूझीलंडविरुद्धच्या पाच सामन्यांच्या मालिकेत पहिल्याच सामन्यात भारताने ४८ धावांनी दणदणीत विजय मिळवला. अष्टपैलू कामगिरीच्या जोरावर किवींना धूळ चारत टीम इंडियाने मालिकेत १-० अशी आघाडी घेतली. नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीसाठी उतरलेल्या भारतीय फलंदाजांनी मैदानात फटकेबाजी केली. निर्धारित २० षटकांत भारताने ७ गडी गमावून २३८ धावांचा डोंगर उभा केला. ही न्यूझीलंडविरुद्ध टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील भारताची आतापर्यंतची सर्वोच्च धावसंख्या ठरली आहे. भारतीय फलंदाजांच्या आक्रमक पवित्र्यामुळे न्यूझीलंडच्या गोलंदाजांना लय सापडणे कठीण झाले होते.




२३९ धावांच्या विशाल लक्षाचा पाठलाग करताना न्यूझीलंडच्या संघाने जोरदार प्रयत्न केले. ग्लेन फिलिप्सने धमाकेदार खेळी केली, त्याने ४० चेंडूत ७८ धावा केल्या. पण, तो १४ व्या षटकात बाद झाला. तो एकटा सोडला, तर बाकी कोणता खेळाडू फार काळ तग धरू शकला नाही. ज्यामुळे किवी फलंदाजांना निर्धारित षटकांत केवळ २०० धावांपर्यंतच मजल मारता आली. न्यूझीलंडने शेवटपर्यंत संघर्ष केला, पण वाढत्या धावगतीच्या दबावामुळे त्यांना ३८ धावांनी पराभव स्वीकारावा लागला.

अभिषेक शर्मा आणि संजू सॅमसन यांनी टीम इंडियाच्या डावाची सुरुवात केली. मात्र संजू सॅमसन केवळ ७ चेंडूमध्ये १० धावा करून बाद झाला. काइल जैमीसनने त्याला माघारी धाडले. त्यानंतर तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजीस आलेला ईशान किशनही फार काळ टिकू शकला नाही. त्याने ५ चेंडूमध्ये ८ धावा करून तोही बाद झाला.

यानंतर अभिषेक शर्मा आणि कर्णधार सूर्यकुमार यादव यांच्यात तिसऱ्या विकेटसाठी ९९ धावांची भागीदारी झाली. दोघांनीही न्यूझीलंडच्या गोलंदाजांची चांगलीच धुलाई केली. मात्र त्यानंतर सूर्याकुमार यादव ३२ चेंडूमध्ये २२ धावा करून बाद झाला. मिचेल सॅन्टनरने त्याला पॅव्हेलियनचा रस्ता दाखवला.

अभिषेक शर्मा आणि रिंकू सिंगची वादळी खेळी

यानंतर अभिषेक शर्माने आपली वादळी खेळी सुरूच ठेवली, पण दमदार इनिंगनंतर तो बाद झाला. त्याने अवघ्या ३५ चेंडूमध्ये ८४ धावांची धमाकेदार खेळी साकारली. या खेळीत त्याच्या बॅटमधून ५ चौकार आणि ८ षटकार निघाले. अभिषेकने २४० च्या स्ट्राइक रेटने फलंदाजी करत प्रेक्षकांचे मनोरंजन केले. त्यानंतर शिवम दुबे केवळ ९ धावा करून बाद झाला. हार्दिक पांड्याने १६ चेंडूमध्ये २५ धावांची खेळी केली, मात्र तोही बाद झाला. अखेरीस रिंकू सिंगने खऱ्या अर्थाने फिनिशरची भूमिका बजावली. रिंकूने २० चेंडूमध्ये नाबाद ४४ धावांची स्फोटक खेळी केली. या खेळीत त्याने ४ चौकार आणि ३ षटकार ठोकले. न्यूझीलंडकडून जेकब डफी आणि काइल जैमीसन यांनी प्रत्येकी २-२ गडी बाद केले.

### भारताला सर्वात मोठा दिलासा

### एकाच दगडात दोघांची लाज काढली

# बांगलादेशसह पाकिस्तानचा माज आयसीसीने उतरवला






**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : बांगलादेशसह आता पाकिस्तानचा माज आयसीसीने एकाच फटक्यात उतरवला आहे. बांगलादेशच्या मदतीला पाकिस्तान धावून आली होती आणि त्यांनी आयसीसीसह भारताला कोंडीत पकडण्याचा प्रयत्न केला होता. पण यावेळी आयसीसीने एकाच दगडात दोन पक्षी त्यांनी मारले असून एक जबरदस्त मास्टरस्ट्रोक त्यांनी यावेळी खेळला आहे.

बांगलादेशने सांगितले होते की, भारतात आम्हाला वर्ल्ड कपचा एकही सामना खेळायचा नाही. भारताला धक्का देण्याची त्यांची तयारी होती, पण आयसीसीने त्यांना नकार दिला होता. बांगलादेशची बाजू कमकुवत असल्याचे पाकिस्तानने पाहिले आणि त्यांनी त्यांची मदत करण्याचा प्रयत्न केला. पाकिस्तानने यावेळी वर्ल्ड कप खेळणाऱ्या सर्व देशांना इमेल पाठवले आणि भारतात सामने खेळणे असुरक्षित वाटत असल्याचे सांगितले होते. पाकिस्तानचा हा आयसीसीला एक मोठा धक्का असल्याचे म्हटले जात होते. पण आता आयसीसीने बांगलादेशसह पाकिस्तानला मोठा धक्का दिला आहे.

आयसीसीने आज स्पष्ट केले की, आयसीसी पुरुष टी-२० विश्वचषक नियोजित वेळापत्रकानुसारच होईल आणि बांगलादेशचे सामने भारतातच खेळले जातील. बांगलादेश क्रिकेट बोर्डाने (बीसीबी) आपले सामने श्रीलंकेत हलवण्याची विनंती केल्यानंतर, पुढील वाटचालीवर चर्चा करण्यासाठी बोलावलेल्या आयसीसी बोर्डाच्या बैठकीनंतर (व्हिडिओ-कॉन्फरन्सद्वारे) हा निर्णय घेण्यात आला. सर्व सुरक्षा मूल्यांकनांचा विचार करून हा निर्णय घेण्यात आला. या सर्व मूल्यांकनांमधून असे दिसून आले की, भारतातील स्पर्धेच्या कोणत्याही ठिकाणी बांगलादेशच्या खेळाडू, प्रसारमाध्यमांचे प्रतिनिधी, अधिकारी आणि चाहत्यांना कोणताही धोका नाही. आयसीसी बोर्डाने नमूद केले की, स्पर्धेच्या इतक्या जवळ वेळापत्रकात बदल करणे शक्य नाही आणि कोणत्याही विश्वसनीय सुरक्षा धोक्याच्या अनुपस्थितीत, अशा परिस्थितीत वेळापत्रकात बदल केल्यास एक असा पायंडा पडेल, ज्यामुळे भविष्यातील आयसीसी स्पर्धांच्या पावित्र्याला धोका निर्माण होईल आणि जागतिक नियामक संस्था म्हणून तिची तटस्थता कमी होईल. आयसीसी व्यवस्थापनाने हा पेच सोडवण्यासाठी बीसीबीसोबत अनेक पत्रव्यवहार आणि बैठका घेतल्या, ज्यात केंद्र आणि राज्य स्तरावरील कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणांच्या बहुस्तरीय समर्थनासह, स्पर्धेच्या सुरक्षा योजनेची सविस्तर माहिती सामायिक केली.

आयसीसीच्या प्रवक्त्याने सांगितले: गेल्या काही आठवड्यांपासून, आयसीसीने बीसीबीसोबत सातत्यपूर्ण आणि विधायक संवाद साधला आहे, ज्याचा स्पष्ट उद्देश बांगलादेशचा स्पर्धेत सहभाग सुनिश्चित करणे हा होता. या काळात, आयसीसीने स्वतंत्र सुरक्षा मूल्यांकन, ठिकाणांनुसार सर्वसमावेशक सुरक्षा योजना आणि यजमान अधिकाऱ्यांकडून औपचारिक आश्वासनांसह सविस्तर माहिती सामायिक केली, ज्या सर्वांचा निष्कर्ष सातत्याने हाच होता की, भारतात बांगलादेश संघाच्या सुरक्षिततेला कोणताही विश्वसनीय किंवा पडताळण्याजोगा धोका नाही.

आयसीसीने आता हा वर्ल्ड कपबाहत मोठा निर्णय घेतला आहे. त्यामुळे आता बांगलादेश आणि पाकिस्तान या निर्णयाचा स्वीकार करतात का, याकडे सर्वांचे लक्ष लागलेले असणार आहे.

दैनिक
# यश सिद्धि न्यूज




## संपादकीय....

### सौर ऊर्जा कार्यक्रम

महाराष्ट्राने आशियातील सर्वात मोठा विकेंद्रित सौर ऊर्जा कार्यक्रम राबवून यशोगाथा रचली आहे, असे नमूद करून या वर्षाच्या अखेरपर्यंत १६ गिगावॅट वीज सौर ऊर्जेच्या माध्यमातून उपलब्ध होईल. मुख्यमंत्री फडणवीस यांनी रूफटॉप सोलर, सौर पंप, अब्जावधींची वीजखर्च बचत, कार्बन उत्सर्जनात मोठी घट, तसेच सौरऊर्जा, बॅटरी स्टोरेज आणि पंप स्टोरेजद्वारे भविष्यात राज्य व राष्ट्रीय वीज ग्रीड स्थिर करण्याच्या योजनांची माहिती दिली. महाराष्ट्राने दशकापेक्षा कमी काळात संपूर्ण ऊर्जा क्षेत्राचा चेहरामोहरा बदलून टाकला आहे. महाराष्ट्रातील वीज ग्राहकांमध्ये १० टक्के हे कृषि पंपधारक आहेत, जे एकूण विजेच्या ३०% वीज वापरत होते. त्यांना वीज पुरवठा करण्याचा खर्च प्रति युनिट ८ रुपये होता, तर त्यांच्याकडून फक्त १ रुपया आकारला जात असे. उर्वरित ७ रुपये राज्याकडून किंवा 'क्रॉस सबसिडी'च्या स्वरूपात दिले जात होते, ज्यामुळे औद्योगिक आणि इतर ग्राहकांसाठीच्या विजेच्या दराचा भार वाढत होता. हे एक दुष्टचक्र होते. मात्र, प्रधानमंत्री नरेंद्र मोदीजींच्या दूरदृष्टीने आम्ही शेतीचा संपूर्ण वीज भार सौर ऊर्जेवर हलवण्याचा निर्णय घेतला. आशियातील सर्वात मोठी 'विकेंद्रित सौर ऊर्जा योजना' सुरू केली. याद्वारे प्रत्येक कृषी फिडर स्वतंत्रपणे सौरऊर्जेवर आणला गेला. शेतकऱ्यांना वीज पुरवण्यासाठी आम्ही स्वतंत्र कंपनी स्थापन केली. आता या वितरण प्रणालीद्वारे सुमारे १६ गिगावॅट वीज निर्माण केली जाईल आणि या वर्षाच्या अखेरीस हा प्रकल्प पूर्ण होईल व हे काम प्रगतीपथावर आहे. आम्ही दरमहा सुमारे ५०० मेगावॅट समर्पित करत आहे.

# मुख्यमंत्र्यांनी दावोसमधून अनुभवला भारतातील पहिल्या आंतरराष्ट्रीय सायकलिंग 'ग्रँड टूर'चा थरार



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे/दावोस : महाराष्ट्राच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवणारी आणि भारतीय क्रीडा विश्वात नवा इतिहास घडवणारी 'बजाज पुणे ग्रँड टूर' या आंतरराष्ट्रीय सायकल स्पर्धेला आज सुरूवात झाली. देशातील ही पहिलीच आंतरराष्टीय 'ग्रँड टूर' सायकल स्पर्धा असल्याने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दावोस येथील आपल्या व्यस्त कार्यक्रमात वेळ काढून स्पर्धेचे थेट प्रक्षेपण पाहिले.

'बजाज पुणे ग्रँड टूर' ला जागतिक स्तरावर 'टूर डी फ्रान्स'सारख्या स्पर्धांना असलेली प्रतिष्ठा मिळली आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांनी दावोस येथील औद्योगिक परिषदेसाठी जाण्यापूर्वी शुभारंभ कार्यक्रमात जगभरातील सायकलपटूंचे स्वागत केले होते. दावोस येथे राज्याच्या औद्योगिक विकासासाठी विविध उद्योग संस्थांशी सामंजस्य करार करण्यात व्यस्त असतानाही त्यांनी महाराष्ट्र आणि पुण्याची आठवण ठेवली. राज्याच्या क्रीडा संस्कृतीला चालना देण्यासाठी महत्त्वाच्या असलेल्या या स्पर्धेचा आनंद घेण्यासाठी त्यांनी सोबत असलेल्या अधिकाऱ्यांच्या लॅपटॉपवर स्पर्धेतील थरार अनुभवला.

या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार होत असतांना त्यांनी सायकलपटूंच्या कौशल्याचेही कौतुक केले. सायकलपटूंना पुण्यात मिळणारा प्रतिसाद, इथेले उत्सवाचे स्वरुप, सायकलपटूंना प्रोत्साहन देण्यासाठी आलेली तरुणाई पाहून त्यांनी आनंद व्यक्त केला. ही स्पर्धा राज्यातील क्रीडा क्षेत्राला प्रेरक ठरेल आणि सायकलचे शहर ही पुण्याची जुनी ओळख नव्या रुपात पुढे येईल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

मुख्यमंत्री फडणवीस दावोस येथे वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमसाठी गेले आहेत. दिवसभराच्या व्यस्त कार्यक्रमात दोन्ही देशातील वेळांचा फरक लक्षात घेवून त्यांनी स्पर्धेच्यावेळी थेट प्रक्षेपण पाहण्याची इच्छा व्यक्त केली. मुख्यमंत्री सचिवालयाच्या अपर मुख्य सचिव अश्विनी भिडे, प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी, उद्योग विभागाचे प्रधान सचिव पी. अन्बलगन, विकास आयुक्त दिपेंद्रसिंह कुशवाह, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी.वेलारसू यांनी देखील थेट प्रक्षेपण पाहताना स्पर्धेचा आनंद घेतला.

एका बाजूला महाराष्ट्रात हजारो कोटी रुपयांची गुंतवणूक आणण्यासाठी विविध देशांतील उद्योगसमूहांसोबत सामंजस्य करार होत असताना, दुसऱ्या बाजूला राज्यातील क्रीडा क्षेत्रात घडणाऱ्या या ऐतिहासिक घडामोडीकडे दिलेले विशेष लक्ष क्रीडा क्षेत्राला निश्चितपणे प्रोत्साहन देणारे आहे. भारतामध्ये पहिल्यांदाच होत असलेल्या 'ग्रँड टूर' स्वरूपाच्या या स्पर्धेला जागतिक व्यासपीठावरून मिळालेली ही दाद क्रीडा क्षेत्रासाठी अभिमानास्पद ठरली आहे.

आंतरराष्ट्रीय दर्जाचे नियम, अत्याधुनिक आयोजन आणि विविध देशांतील नामवंत सायकलपटूंचा सहभाग यामुळे 'बजाज पुणे ग्रँड टूर'ने पुण्याला जागतिक सायकलिंगच्या नकाशावर ठळक स्थान मिळवून दिले आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांनी दावोससारख्या आंतरराष्ट्रीय मंचावरून या स्पर्धेचा थरार अनुभवणे, हे आयोजक, खेळाडू तसेच क्रीडाप्रेमींसाठी मोठे प्रोत्साहन ठरले असून, यामुळे महाराष्ट्रात क्रीडा संस्कृती अधिक बळकट होण्यास निश्चितच चालना मिळणार आहे.

# पुण्याची सायकल टूर अपघातामुळे २३ मिनिटे थांबवली, मलेशियाच्या तरुणाचे स्वप्न भंगले

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : पुणे ग्रँड चॅलेंज सायकल टूर दरम्यान मुळशी तहसीलमधील मुळशी-कोळवण रोडवर सायकलस्वार एकमेकांवर आदळले. या भीषण अपघातात अनेक खेळाडू जखमी झाले. या अपघाताचा फटका मलेशियाच्या एका सायकलस्वाराला बसला असून तो शर्यत पूर्ण करू शकला नाही. सायकलस्वारांच्या अपघातामुळे शर्यत २३ मिनिटांसाठी थांबवण्यात आली होती. या अपघातामुळे मोठी खळबळ उडाली आहे.

पुणे जिल्हा सायकलिंग असोसिएशन आणि राज्य सरकारच्या सहकार्याने आयोजित ही आंतरराष्ट्रीय स्पर्धेला मोठ्या उत्साहात सुरुवात झाली. मात्र स्पर्धेच्या दुसऱ्याच दिवशी अपघात झाल्याने खळबळ उडाली आहे.

स्पर्धेदरम्यान सायकलचा वेग प्रचंड असल्याने मागून येणाऱ्या खेळाडूंना ब्रेक लावणे अशक्य झाले. त्यामुळे काही क्षणातच एकावर एक सायकलींचा खच पडला. यामध्ये अनेक खेळाडूंना गंभीर दुखापत झाली असून सायकलींचे अक्षरश: तुकडे झाले होते.

**शर्यत २३ मिनिटांसाठी थांबवण्यात आली**

सायकलस्वारांचा अपघात झाल्यानंतर ठरलेल्या नियमावलीनुसार शर्यत २३ मिनिटांसाठी थांबवण्यात आली. खेळाडूंना ताफ्यातील वैद्यकीय पथकाद्वारे तातडीने प्रथमोपचार देण्यात आले आणि त्यांना त्यांच्या सायकली बदलण्याची परवानगी देण्यात आली. सायकलस्वार पुन्हा रस्त्यावर उतरून शर्यत पूर्ण केली. केवळ मलेशिया राष्ट्रीय संघाचा सायकलस्वार क्रमांक १६१ अब्दुल हलिल मोहम्मद इझत हा शर्यत पूर्ण करू शकला नाही. मात्र, सायकलस्वार क्रमांक १९१ एन्झो फुएन्टेस कॅपरोली आणि क्रमांक १९५ मार्टी रियारा कॅसानोव्हा (दोघेही प्रो सायकलिंग स्टॅट्स संघाचे) यांनी सायकल बदलल्यानंतर आपली शर्यत यशस्वीरित्या पूर्ण केली.

**कोणालाही गंभीर दुखापत नाही**

मुळशी-कोळवण रस्त्यावर अरुंद रस्त्याचा अंदाज न आल्याने सायकलपटूंचा अपघात झाला मुळशीतील कोळवण रोडवरून सायकलपटू पुढे जात असताना रस्त्याची रुंदी अचानक कमी झाली. ताशी ६० ते ७० किमी वेगाने धावणाऱ्या सायकलपटूंना या अरुंद रस्त्याचा आणि तीव्र वळणाचा अंदाज आला नाही. आघाडीच्या सायकलपटूचा ताबा सुटल्याने मागून येणारे खेळाडू एकापाठोपाठ एक एकमेकांवर आदळले. या अपघातात कोणालाही गंभीर दुखापत झालेली नाही आणि कोणालाही रुग्णालयात दाखल करण्याची गरज भासली नाही.

**पुढील टप्प्यांचे वेळापत्रक कसे आहे?**

पाच दिवसांच्या स्पर्धेत ३५ देशांतील १७१ आंतरराष्ट्रीय सायकलपटू सहभागी झाले असून, एकूण ४३७ किलोमीटरच्या या स्पर्धेमुळे पुण्याच्या सांस्कृतिक व ऐतिहासिक वारशाचे जागतिक स्तरावर दर्शन घडत आहे.

२१ जानेवारी : टप्पा २ – मराठा हेरिटेज सर्किट (१०५.३ किमी)

२२ जानेवारी : टप्पा ३ – पश्चिम घाट प्रवेशद्वार (१३४ किमी)

२३ जानेवारी : टप्पा ४ – पुणे प्राईड लूप (९५ किमी)

# मुळशी–मावळ टप्प्यात ल्यूक मडग्वेचे वर्चस्व; हर्षवीर सिंग सर्वोत्तम भारतीय सायकलपटू






**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : भारतातील पहिल्यावहिल्या श्रेणीतील आंतरराष्ट्रीय बहु-स्तरीय सायकलिंग स्पर्धा 'बजाज पुणे ग्रँड टूर २०२६' च्या मुळशी–मावळ टप्प्यात चीनच्या 'ली निंग स्टार' संघाच्या ल्यूक मडग्वे याने दमदार कामगिरी करत निर्विवाद वर्चस्व गाजवले, तर भारतीय राष्ट्रीय संघाच्या हर्षवीर सिंग सेखॉन याने सर्वोत्तम भारतीय सायकलपटू ठरण्याचा मान पटकावला.

हिंजवडी येथील टी.सी.एस. सर्कल येथून सुरू झालेल्या ८७.२ किलोमीटरच्या 'मुळशी–मावळ माईल्स' या पहिल्या टप्प्यात ल्यूक मडग्वे याने अवघ्या २ तास २१ सेकंदात शर्यत पूर्ण करत विजेतेपद मिळवले. सुरुवातीपासूनच वेगवान आणि तांत्रिक खेळाचे दर्शन घडवणाऱ्या या टप्प्यात शेवटच्या काही क्षणांत मडग्वे याने निर्णायक आघाडी घेत विजयावर शिक्कामोर्तब केले. एस्टोनियाच्या 'क्विक प्रो टीम'चा अँड्रियास मॅटिल्डास (०२:००:२७) दुसऱ्या, तर बेल्जियमच्या 'टार्टलेटो–इसोरेक्स' संघाचा योर्बेन लॉरीसन (०२:००:३०) तिसऱ्या क्रमांकावर राहिला. णउख नियमांनुसार पहिल्या तीन क्रमांकाच्या खेळाडूंना अनुक्रमे १०, ६ आणि ४ सेकंदांचा टाइम बोनस देण्यात आला असून, तो पुढील टप्प्यांसाठी महत्त्वाचा ठरणार आहे.

दरम्यान, शर्यत सुरू झाल्यानंतर पहिल्या चेकपॉईंटनंतर दुसऱ्या गटातील काही सायकलपटूंमध्ये अपघात झाला. सुरक्षिततेच्या दृष्टीने आणि ळण्घ च्या सुरक्षा प्रोटोकॉलनुसार स्पर्धा सुमारे २३ मिनिटे थांबवण्यात आली होती. वैद्यकीय आणि तांत्रिक पथकाने तातडीने मदत केल्यानंतर शर्यत पुन्हा सुरू करण्यात आली.

पहिल्या टप्प्यानंतर विविध श्रेणींतील आघाडीवर असलेल्या खेळाडूंना जर्सी प्रदान करण्यात आल्या. सर्वसाधारण वर्गीकरण आणि पॉइंट्स वर्गीकरणात ल्यूक मडग्वे याने यलो आणि ग्रीन जर्सी मिळवली. बेस्ट क्लायंबर म्हणून क्रिस्टियन रायलेनु (चीन) याला पोलका डॉट जर्सी, सर्वोत्तम आशियाई खेळाडू म्हणून जंबालजाम्ट्स स ै न ब य ा र (मंगोलिया) याला ऑरेंज जर्सी, सर्वोत्तम युवा खेळाडू म्हणून तामर स्पिएरो (नेदरलँड) याला व्हाईट जर्सी, तर सर्वोत्तम भारतीय खेळाडू म्हणून हर्षवीर सिंग सेखॉन याला ब्लू जर्सी प्रदान करण्यात आली. या टप्प्यातील विजेत्या खेळाडूंचा गौरव खासदार मेधा कुलकर्णी, आमदार उमा खापरे, अमित गोरखे, शंकर जगताप, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आयुक्त श्रावण हर्डीकर, पिंपरी-चिंचवड शहरचे पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांच्यासह आदी मान्यवर यांच्या हस्ते करण्यात आला.

आता सर्वांचे लक्ष उद्या, २१ जानेवारी रोजी होणाऱ्या 'मराठा हेरिटेज सर्किट' या दुसऱ्या टप्प्याकडे लागले आहे. १०५.३ किलोमीटरच्या या खडतर मार्गात सायकलपटूंना १,०५१ मीटरची उंची सर करावी लागणार असून, पुरंदर किल्ला, सिंहगड आणि खडकवासला तलाव परिसरातून जाणारा हा टप्पा खेळाडूंच्या सहनशक्तीची कसोटी पाहणारा ठरणार आहे.

पुणे जिल्हा प्रशासन, महाराष्ट्र शासन आणि सायकलिंग फेडरेशन ऑफ इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या पाच दिवसांच्या स्पर्धेत ३५ देशांतील १७१ आंतरराष्ट्रीय सायकलपटू सहभागी झाले असून, एकूण ४३७ किलोमीटरच्या या स्पर्धेमुळे पुण्याच्या सांस्कृतिक व ऐतिहासिक वारशाचे जागतिक स्तरावर दर्शन घडत आहे.

**पुढील टप्प्यांचे वेळापत्रक :**

– २१ जानेवारी : टप्पा २ – मराठा हेरिटेज सर्किट (१०५.३ किमी) – २२ जानेवारी : टप्पा ३ – पश्चिम घाट प्रवेशद्वार (१३४ किमी)

– २३ जानेवारी : टप्पा ४ – पुणे प्राईड लूप (९५ किमी)

# नदी पुनरुज्जीवनासाठी महाराष्ट्राचे मोठे पाऊल, पंकजा मुंडे यांनी केले सादरीकरण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : महाराष्ट्रातील नद्यांना प्रदूषणाच्या विळख्यातून मुक्त करण्यासाठी राज्य सरकारने एक ऐतिहासिक पुढाकार घेतला असून, यासाठी 'राज्य नदी पुनरुज्जीवन प्राधिकरण' स्थापन करण्याची महत्त्वपूर्ण संकल्पना मांडली होती. राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग आणि पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी आज नवी दिल्ली येथे केंद्रीय जलशक्ती मंत्री सी. आर. पाटील यांची त्यांच्या निवासस्थानी भेट घेऊन यासंदर्भातील देशातील पहिल्या प्रस्तावाचे सादरीकरण केले.



या विशेष बैठकीत पंकजा मुंडे यांनी राज्यातील जल आणि पर्यावरण प्रकल्पांच्या सद्यस्थितीवर सविस्तर चर्चा केली. नद्यांच्या स्वच्छतेसाठी केंद्र सरकारच्या मदतीसोबतच राज्याची स्वत:ची एक स्वतंत्र यंत्रणा आणि नियोजन असणे काळाची गरज असल्याचे त्यांनी यावेळी अधोरेखित केले.

पंकजा यांनी देशातील अनेक नद्या विविध राज्यांतून प्रवाहित होतात. जर प्रत्येक राज्याने आपल्या भौगोलिक सीमेतील नदीपात्राच्या स्वच्छतेसाठी आणि पुनरुज्जीवनासाठी स्थानिक पातळीवर प्रभावी आणि सुनियोजित योजनांची अंमलबजावणी केली, तर नद्यांचे पूर्णत: प्रदूषणमुक्त होण्याचे स्वप्न सत्यात उतरू शकेल असे सांगितले. या प्रक्रियेमुळे भविष्यात नद्यांचे पावित्र्य आणि त्यांची नैसर्गिक प्राकृतिकता टिकवून ठेवण्यात देशाला मोठे यश मिळेल, असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला.

या प्रस्तावावर केंद्रीय मंत्री सी. आर. पाटील यांनी सकारात्मक प्रतिसाद देत आवश्यक मार्गदर्शन केले. तसेच महाराष्ट्राने याबाबत घेतलेल्या पुढाकारबद्दल विशेष कौतुक केले आणि यासाठी सर्वोतोपरी सहाय्य करण्याचे आश्वासन दिले.

या बैठकीस राष्ट्रीय नदी संरक्षण संचलनालयाचे संचालक राजेश कुमार, महाराष्ट्र राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या सचिव श्रीमती जयश्री भोज यांसह केंद्र व राज्यातील इतर वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते.

महाराष्ट्रातील नद्यांना प्रदूषणाच्या विळख्यातून मुक्त करण्यासाठी राज्य सरकारने ऐतिहासिक पुढाकार घेत 'राज्य नदी पुनरुज्जीवन प्राधिकरण' स्थापन करण्याची महत्त्वपूर्ण संकल्पना मांडली होती. राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग आणि पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी नवी दिल्ली येथे केंद्रीय जलशक्ती मंत्री सी. आर. पाटील यांची त्यांच्या निवासस्थानी भेट घेऊन यासंदर्भातील प्रस्तावाचे सादरीकरण केले. या प्राधिकरणास मंजुरी मिळाल्यास ते देशातील पहिले प्राधिकरण ठरणार असल्याचे मंत्री पंकजा मुंडे यांनी सांगितले.

या विशेष बैठकीत मंत्री मुंडे यांनी राज्यातील जल आणि पर्यावरण प्रकल्पांच्या सद्यस्थितीवर सविस्तर चर्चा केली. नद्यांच्या स्वच्छतेसाठी केंद्र सरकारच्या मदतीसोबतच राज्याची स्वत:ची एक स्वतंत्र यंत्रणा आणि नियोजन असणे काळाची गरज असल्याचे त्यांनी यावेळी अधोरेखित केले. देशातील अनेक नद्या विविध राज्यांतून प्रवाहित होतात. जर प्रत्येक राज्याने आपल्या भौगोलिक सीमेतील नदीपात्राच्या स्वच्छतेसाठी आणि पुनरुज्जीवनासाठी स्थानिक पातळीवर प्रभावी व सुनियोजित योजनांची अंमलबजावणी केली, तर नद्यांचे पूर्णत: प्रदूषणमुक्त करण्याचे स्वप्न सत्यात उतरू शकेल असे मंत्री मुंडे यांनी यावेळी सांगितले. या प्रक्रियेमुळे भविष्यात नद्यांचे पावित्र्य आणि त्यांची नैसर्गिक प्राकृतिकता टिकवून ठेवण्यात देशाला मोठे यश मिळेल, असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला.

या प्रस्तावावर केंद्रीय मंत्री पाटील यांनी सकारात्मक प्रतिसाद देत आवश्यक मार्गदर्शन केले. तसेच महाराष्ट्राने याबाबत घेतलेल्या पुढाकाराबद्दल विशेष कौतुक केले आणि यासाठी सर्वतोपरी सहाय्य करण्याचे आश्वासन दिले.

या बैठकीस राष्ट्रीय नदी संरक्षण संचलनालयाचे (एनआरसीडी) संचालक राजेश कुमार, महाराष्ट्र राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या सचिव जयश्री भोज यांसह केंद्र व राज्यातील इतर वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल – yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या विवाह सोहळ्यानिमित्त मंदिर व परिसरात आकर्षक विद्युत रोषणाई





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
पंढरपूर : श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या विवाह सोहळ्यानिमित्त श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर, मंदिर परिसर, श्री संत तुकाराम भवन तसेच श्री संत ज्ञानेश्वर दर्शन मंडप येथे आकर्षक व भव्य विद्युत रोषणाई करण्यात आली आहे, अशी माहिती श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली.

श्री विठ्ठलांच्या गाभाऱ्यावरील कळसास विशेष विद्युत रोषणाई करण्यात आल्यामुळे भाविक कळस दर्शनासह रोषणाईचा मनमुराद आनंद घेत आहेत. संपूर्ण मंदिर परिसर प्रकाशमय झाल्याने भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

ही विद्युत रोषणाई श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीमार्फत करण्यात आली असून, याची जबाबदारी विभाग प्रमुख शंकर मदने यांच्याकडे सोपविण्यात आली आहे. यासाठी एलईडी माळा, लटकन, तोरणे, रोप लाईट, आर्टिकल लाईट्स, व्हाईट व वॉर्म फोकस लाईट्स आदी अत्याधुनिक साधनांचा वापर करण्यात आला आहे. तसेच सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक ती अत्याधुनिक यंत्रणा देखील बसविण्यात आली आहे.

# प्रस्थापितांच्या विरोधात लढणार कोणत्याही दबावाला बळी पडणार नाही : आ. अभिजीत पाटील



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
पंढरपूर/प्रतिनिधी : जिल्हा परिषद व पंचायत समिती उमेदवार भरण्यास सुरुवात झाली आहे. प्रस्थापितांच्या विरोधात अर्ज दाखल करण्यासाठी आघाडीतून अर्ज दाखल करण्यात आले आहे. कोणत्याही दबावाला बळी पडणार नाही असे आमदार अमित पाटील यांनी पत्रकाराची बोलताना सांगितले.

जिल्हा परिषद व पंचायत समिती उमेदवाराचा अर्ज दाखल करण्याचा आज बुधवार शेवटचा दिवस आहे. उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी अनेक इच्छुक उमेदवाराने तहसील कार्यासमोर गर्दी केली होती. प्रस्थापित व भाजपच्या विरोधात उमेदवारी दाखल केल्यामुळे ही निवडणूक अटीतटीची होणार असल्याचे दिसून येत आहे. परंतु ऐनवेळी आमदार अभिजीत पाटील यांना दबाव आल्यास निवडणुकीतून बाजूला होतील अशी नागरिकांतून चर्चा आहे. याबाबत पत्रकारांनी विचारले असता नगरपालिकेच्या निवडणुकीप्रमाणे यंदाच्या निवडणुकीत होणार नाही. कोणत्याही दबावाला बळी पडणार नसून यावेळी दोन्ही राष्ट्रवादी एकत्र आले असून आम्ही विजय संपादन करणार आहे.

# अणदुर जिल्हा परिषद गटातून वंचित बहुजन आघाडीचे आर.एस. गायकवाड निवडणूक रिंगणात



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
वागदरी/प्रतिनिधी : धाराशिव जिल्ह्यात होऊ घातलेल्या जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकीत अणदूर जिल्हा परिषद गटातून वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा उपाअध्यक्ष आर. एस.गायकवाड यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला असून त्यांनी निवडणुकीच्या रिंगणात उतरल्याने विरोधी पक्षा समोर एक मोठे आव्हान उभे राहण्याची शक्यता आहे.

आर. एस. गायकवाड हे मूळचे अणदुर तालुका तुळजापूर येथील रहिवासी असून ते आंबेडकरी चळवळीतील एक संघर्षशील कार्यकर्ते आहेत. समाजाच्या अनेक प्रश्नावर त्यांनी आतापर्यंत उपोषण आंदोलन करून सामान्यजणांच्या न्याय हक्कासाठी सातत्याने संघर्ष करीत आलेले आहेत. ते श्रद्धेय ड.बाळासाहेब तथा प्रकाश आंबेडकर यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा उपाध्यक्ष म्हणून सध्या कार्यरत आहेत.होऊ घातलेल्या जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकीमध्ये त्यानी अणदूर जि.प. गटातून वंचित बहुजन आघाडी कडून आपली उमेदवारी दाखल केली असून त्यांच्या उमेदवारीमुळे विरोधी पक्षापुढे एक मोठे आव्हान उभे राहण्याची शक्यता आहे.सध्या वंचित बहुजन आघाडीचे वातावरण महाराष्ट्रभर बऱ्यापैकी आहे. आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते वंचित बहुजन आघाडीकडे आकर्षली जात आहेत त्यामुळे आर.एस.गायकवाड यांची उमेदवारी ही निश्चितच कार्यकर्त्यांना काम करण्याची एक संधी आहे.असे मानले जाते.

त्यांची उमेदवारी ही नेमकी कुणाच्या पत्त्यावर पडते की ते विजय खेचून आणतात हे निवडणूक निकाल नंतर कळेल.

# सावरगाव येथे रासेयो कॅम्पमध्ये कवी संधान यांचे व्याख्यान



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
निफाड/प्रतिनिधी :
निफाड प्रतिनिधी :-
क. का. वाघ महाविद्यालय, काकासाहेबनगर यांच्या राष्ट्रीय सेवा योजना (रासेयो) अंतर्गत सावरगाव येथे आयोजित विशेष शिबिरात प्रा. किरण संधान यांनी माती.. समाज.. शिक्षण या विषयावर आपले मनोगत व्यक्त केले,

व्याख्यानादरम्यान मातीशी नातं, समाजाप्रतीची जबाबदारी आणि शिक्षणाची खरी भूमिका यांचे सुंदर विश्लेषण त्यांनी केले. त्यांच्या विचारांना उपस्थितांकडून उत्स्फूर्त दाद मिळाली.

या कार्यक्रमास कडू , वैभव पंगे तसेच वैभव कुशारे यांची विशेष उपस्थिती लाभली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी रासेयो प्रमुख प्रा. फडे , नितीन लभडे , पाटील आणि राजोळे यांनी मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य केले.

सावरगाव येथील या रासेयो शिबिरात झालेला हा विचारप्रवर्तक संवाद विद्यार्थ्यांच्या सामाजिक जाणीवा समृद्ध करणारा ठरला. कार्यक्रम आयोजकांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# भाजपने निष्ठावंतांना डावलून काळे, पाटील यांना भाजपमधून उमेदवारी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
पंढरपूर/प्रतिनिधी : जिल्हा परिषद वाकडी गटातून मोनिका काळे,(राष्ट्रवादी) अजित पवार गट, व भोसे जि.प. गटातून प्रफुल्लता पाटील, (राष्ट्रवादी)अजित पवार , या दोन्ही उमेदवारांनी अजित पवार गटातून अर्ज दाखल केले होते. परंतु त्यांना एबी फॉर्म पक्षाने न दिल्यामुळे, दोन्ही उमेदवारांना भाजपच्या तिकिटावर उमेदवारी जाहीर करावी लागली, काळे ,पाटील, यांना आज रोजी दुपारी दोन वाजता त्यांना एबी फॉर्म देण्यात आले. श्रीराम घोषणा देत एबी फॉर्म दिला. श्री समाधान काळे यांच्या पत्नी मोनिका काळे यांनी जिल्हा परिषद वाखरी गटातून अर्ज दाखल करताना राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट असा उमेदवार अर्ज दाखल केला होता. तसेच मोशी गटातून विद्यमान सरपंच श्री गणेश पाटील यांच्या मातोश्री प्रफुल्लता पाटील यांनीही राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटातून अर्ज दाखल केला होता. अजित पवार गटाचे एबी फॉर्म आमदार अभिजीत पाटील यांच्याकडे असल्याने त्यांना एबी फॉर्म मिळाला नाही. अखेर त्यांनी भाजपच्या उमेदवारी जाहीर झाली असली तरी निष्ठावंत कार्यकर्त्यांना डावलून यांना उमेदवारी दिली आहे अशी पक्षाने काम केले असल्याची चर्चा आहे.

# महिलांवरील अन्याय विरोधात रस्त्यावर उतरला; दुर्गा भोर



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
पंढरपूर/प्रतिनिधी : तालुका मंचर महिला आणि युट्युब कोणत्याही अन्याय किंवा लैंगिक शोषण करत असलेल्या दुर्गाभोर त्यांच्या विरोधात ठामपणे

आवाज उठवला जाईल कुठल्याही परिस्थितीत अडचणी सापडलेल्यांच्या महिलांच्या मच्छीसाठी अर्ध्या रात्री सुद्धा दुर्गा बोर उभे राहील असा ठाम विश्वास दुर्गा ब्रिगेडचे अध्यक्ष दुर्गा भोर मी व्यक्त केला

एकलुरे तालुका आंबेगाव येथे रविवारी तारीख १८ झालेल्या पत्रकार परिषदेत भोर बोलत होत्या त्यावेळी भोर म्हणाले की महिलांना सक्षम बनवणे व त्यांना स्वाभिमान्यांनी जगता येईल असे सुरक्षित वातावरण निर्माण करणे. आणि सर्वसामान्य माणसाचा आर्थिक विकास घडवून आणणे हे दुर्गा बेडचे प्रमुख ध्येय आहे. आंबेगाव खेड जुन्नर व शिरूर तालुक्यात महिलांसाठी विविध कौशल्य विकास व स्वयंरोजगार प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार असून महिलांना स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी सर्वतोपरी मदत केली जाईल महिलांना त्यांच्या कायदेशीर हक्काची माहिती मिळाली यासाठी कायदेविषयक मार्गदर्शन व व जनजागृती उपक्रम राबविण्यात येणार आहे.

युवक युतींसाठी रोजगार विमुख कामगाराच्या संघटनेसाठी संघटित लढा तसेच आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांच्या उन्नतीसाठी विशेष योजना राबविण्यात निर्धार दुर्गा ब्रिगेड असे बोलताना दुर्गा भोर यांनी सांगितले.

# खामसवाडी येथे श्री कोचिंग क्लासेसच्या वतीने पृथविराज कदम यांचा सत्कार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
खामसवाडी/प्रतिनिधीः हनुमंत पाटुळे, कळंब तालुक्यातील खामसवाडी येथील सुपुत्र पृथ्वीराज प्रभाकर कदम याची आय.बी.पी.एस.मार्फत होणाऱ्या परीक्षेतून बँक ऑफ बडोदा मध्ये प्रोफेशनल ऑफिसर म्हणून निवड झाल्याबद्दल श्री कोचिंग क्लासेस खामसवाडी येथे त्यांचा पालकासमवेत सत्कार करण्यात आला. यावेळी पृथ्वीराजने इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांना आय.बी.पी.एस म्हणजे काय? व बँकिंग क्षेत्रातील परीक्षा या विषयी सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी सर्वश्री प्रभाकर कदम, श्रीराम आप्पा कदम ,सोमनाथ आप्पा हिरे ,सुशील नाना शेळके, अमोल रोहिले, संतोष शेळके, रवी शेळके आदी उपस्थित होते.



## गोरेगाव सत्र न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निकाल

# गोरेगाव फिल्म सिटी हत्याकांड प्रकरणात सर्व आठ आरोपींची निर्दोष मुक्तता

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
ठाणे/प्रतिनिधी : गोरेगाव सत्र न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निकाल गोरेगाव बहुचर्चित फिल्म सिटी हत्याकांडातील राजू उर्फ श्रीकांत शिंदे खून प्रकरणात दिंडोशी येथील बोरवली विभागाच्या सत्र न्यायालयाने सर्व आठही आरोपींची निर्दोष मुक्तता केलेली आहे

५ जानेवारी २०२६ रोजी अतिरिक्त सत्र न्यायाधीश टी टी आगलावे यांनी हा महत्त्वपूर्ण निकाल दिला सदर प्रकरणात सरकार पक्षातर्फे सरकारी वकील इम्रान पी शेख यांनी बाजू मांडली.सदर खटला गोरेगाव येथील आरे पोलीस ठाण्याच्या तपासावर आधारित होता अभियोजन पक्षानुसार फिल्मसिटी परिसरात सुरक्षा सेवा व्यवसाय करणाऱ्या श्रीकांत उर्फ राजू शिंदे यांच्यावर २२ मे २०१५ रोजी गोरेगाव आरे कॉलनीतील फिल्मसिटी परिसरात कालिया मैदानाजवळ बालाजी टेलिफिल्म्सच्या सेट समोर गोळीबार करण्यात आला होता

हेल्मेट घातलेले दोन अज्ञान व्यक्ती मोटरसायकल वरून येऊन त्यांनी राजू शिंदे यांच्यावर गोळी झाडल्याचा प्रत्यक्ष दर्शनी पोलिसांना सांगितले होते. या हल्लयात राजू शिंदे यांना तीन गोळ्या लागल्या असून त्यांना तत्काळ नानावटी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते सुमारे ४५ दिवस उपचार सुरू असताना दोन जुलै २०१५ रोजी गोळीबाराच्या जखमेमुळे त्यांचा मृत्यू झाला.

त्यानंतर पोलिसांनी तपास करून पुन्हा आठ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करत २१ ऑगस्ट २०२५ रोजी आरोप पत्र सादर केले हे प्रकरण सत्र खटला क्रमांक १८९/२०१५ म्हणून नोंदवण्यात आले.

न्यायालयाने सर्व आरोपीं विरुद्ध भारतीय दंड संहिताच्या कलम ३०२ १२०ब तसेच शस्त्र कायद्याच्या कलम २५ व २७ अंतर्गत आरोप निश्चित केले होते या प्रकरणात सुरेश सुभाष गायकवाड यांना मुख्य सूत्रधार म्हणून दर्शविण्यात आले होते

खटल्याच्या सुनावणी दरम्यान अभियोजन पक्षाने एकूण ३८ साक्षीदार तपासले मात्र उलट तपासणी दरम्यान साक्षीदारांच्या जबाबांमध्ये गंभीर विसंगती आढळून आल्या वेदकीय अधिकाऱ्यांच्या साक्षीत फिर्यादी पक्षाने सांगितलेल्या तीन गोळ्यांच्या जखमान ऐवजी क्षविच्छेदन अहवालात चार गोळ्यांच्या प्रवेश जखमा आढळल्याचे समोर आले


विशेष म्हणजे हल्लयाच्या दिवसापासून मृत्यू होईपर्यंत राजू शिंदे हे वैद्यकीय देखरेखीखाली होते.

तसेच बॅलेस्टिक तज्ञांच्या साक्षीनुसार जप्त करण्यात आलेली शस्त्रे ही कथित गुन्ह्यात वापरलेले शस्त्रांशी जुळत नसल्याचे स्पष्ट झाले तपास अधिकाऱ्यांच्या साक्षीतून हेही निष्पन्न झाले की पीडिताचा मृत्यूपूर्वी जबाब नोंदवण्यात आला असल्याचा दावा असूनही तो जबाब न्यायालय समोर सदर प्रकरणात आलेला नव्हता.

या सर्व त्रुटी आणि संशयस्पद बाबी लक्षात घेता अभियोजन पक्ष आरोप कोणत्याही रास्त शंकेपलीकडे सिद्ध करण्यात अपयशी ठरण्याचे नमूद करत न्यायालयाने सर्व आरोपींना संशयाचा फायदा देत निर्दोष मुक्त केले.

या प्रकरणात सुरेश सुभाष गायकवाड यांचे मुख्य प्रतिनिधित्व ॲड श्रीकांत शिरसाट यांनी तर जुगल उर्फ पप्पू बाबू दोडिया याचे प्रतिनिधित्व ॲड सपना हजारे यांनी केले तसेच सहकारी वकील म्हणून ॲड रवींद्र सोपान , ॲड नरेश गायकवाड ,ॲड प्रशांत जाधव आणि सहकारी आयुष्य राम पांडे यांनी काम पाहिले.

# 'शौर्य आणि साहसाचा सोहळा' निफाडला एक दिवसीय कमांडो शिबीर संपन्न





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
निफाड/प्रतिनिधी : न्या.रानडे विद्या प्रसारक संस्थेचे वैनतेय इंग्लिश मीडियम स्कूल, निफाड ...येथे इयत्ता १ली ते ९वीच्या विद्यार्थ्यांसाठी एक दिवसीय कमांडो शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. सदर कॅम्पसाठी एकूण साठ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता . या शिबिराचे नियोजन विद्यालयाच्या प्राचार्या सौ. सानप , कमांडो ट्रेनर व सहाय्यक शिक्षक यांच्या सहकार्याने संपन्न झाला . या शिबिराअंतर्गत विद्यार्थ्यांनी शिबिराचा पुरेपूर आनंद घेतला. त्यांनी ड्रिल ,बोन फायर, नृत्य आणि कृती अशा विविध उपक्रम राबविले . ज्यामुळे आनंद शिस्त आणि टीम वर्क चे वातावरण निर्माण झाले .

सकाळचे सत्रात सकाळी प्रार्थनेने सुरू झाले. त्यानंतर वॉर्म अप व्यायाम, झुंबा, हेरोबिक्स आणि नृत्य झाले संस्थेचे विश्वस्त विश्वासराव कराड आणि मधुकर तात्या राऊत यांनी शिबिराला भेट दिली. प्रशिक्षक व कर्मचाऱ्यांना प्रेरणा मिळाली .न्याय. रानडे विद्या प्रसारक मंडळ संस्थेचे कार्यकारी विश्वस्त वि.दा. व्यवहारे ,संस्थेचे सचिव रतन पाटील वडघुले , संस्थेचे विश्वस्त दिलीप वाघावकर, किरण कापसे ,राजेंद्र राठी ,राजेश सोनी ,प्रभाकर कुयटे, नरेंद्र नांदे यांनी शिबिरासाठी शुभेच्छा देऊन विद्यार्थी व कमांडो प्रशिक्षकांचे कौतुक केले विद्यार्थ्यांमध्ये शिस्त आत्मविश्वास निर्माण झाला.

विद्यालयात एकदिवसीय शिबिर उत्साहात संपन्न झाले.

# अहिल्यापुलावरील संरक्षक कठडे तात्काळ दुरुस्त करावेत : प्रांताधिकारी सचिन इथापे

## यात्रा कालावधीत कोणतीही अनुचित घटना घडू नये यासाठी प्रांताधिकारी सचिन इथापे यांनी दिली प्रकाश व्यवस्थेची सूचना



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : माघ शुद्ध एकादशी २९ जानेवारी २०२६ रोजी होणार आहे. यात्रा कालावधी २३ जानेवारी ते ०१ फेब्रुवारी असून, श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी पंढरपुरात तीन ते चार लाख भाविक येतात. या यात्रा कालावधीत अहिल्या पुलावरुन वारकरी भाविकांच्या व इतर वाहनांची मोठ्या प्रमाणात वाहतुक होत असते. अहिल्या पुलावरील संरक्षक कठडे नादुरुस्त असून, या ठिकाणी कोणतीही अनुचित घडना घडू नये यासाठी तात्काळ मजबूत संरक्षक कठडे करावेत तसेच प्रखर प्रकाश व्यवस्था करावी अशा सूचना प्रांताधिकारी सचिन इथापे यांनी दिल्या.

माघवारी पूर्व नियोजनाबाबत प्रांत कार्यालय पंढरपूर येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीस मंदीर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, उप कार्यकारी अभियंता भीमाशंकर मेटकरी, मुख्याधिकारी महेश रोकडे, पोलीस निरीक्षक दशरथ वाघमोडे, मंदिर समितीचे लेखाधिकारी मुकेश आनेचा, यांच्यासह संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते .

यावेळी प्रांताधिकारी श्री इथापे म्हणाले, यात्रा कालावधीत चंद्रभागा नदीपात्रात वारकरी भाविकांना पवित्र स्नान करता यावे यासाठी पाटबंधारे विभागाने पाणी सोडण्याचे नियोजन करावे. या कालावधीत नगरपालिकेने स्वच्छ पिण्याच्या पाण्याचा मुबलक पाणी पुरवठा करावा, वाळवंटाचीस्वच्छता व पुरेशा प्रकाश राहिल याबाबत नियोजन करावे तसेच अतिक्रमणे काढावीत, बोअरवेल व हातपंप पाण्याची तपासणी करावी. मंदीर समितीने व नगरपालिकेने प्रदक्षिणा मार्ग, नदीपात्रात आवश्यक ठिकाणी बॅरेकेटींग करावे व अग्निशामक यंत्रणा कार्यरत ठेवावी . नदी पात्रात वाहने येऊ नयेत यासाठी बॅरेकेटींग करावे. सुलभ शौचालयाचा ठिकाणी मुबलक पाणी व्यवस्था करावी. वाहनतळाची जादा व्यवस्था करावी. तसेच मोफत वाहनतळ व्यवस्थेबाबत ठळक फलक लावावेत. अन्न औषध प्रशासन विभागाने मठात शिजविण्यात येणाऱ्या अन्नाची तसेच शहरातील हॉटेलची वेळोवेळी तपासणी करावी. शहरात वाहतुकीची कोंडी होऊ नये यासाठी पोलीस प्रशासनाने नियोजन करावे. अशा सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

मंदीर समितीने यात्रा कालावधीत भाविकांना दर्शन रांग, दर्शन मंडप येथे आवश्यक सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्यात येत असून, दर्शनरांगेत मॅट, बसण्याची सुविधा, पिण्याचे पाणी, शौचालये, विश्रांती कक्ष, बाथरूम, लाईव्ह दर्शन आदी सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत.दर्शनरांगेत भाविकांना मोफत चहा व खिचडी वाटप करण्यात येणार आहे. चेंजिंग रूम, हिरकणी कक्ष, दर्शनमंडप येथे महिला भाविकांच्या सोईसाठी सॅनिटरी नॅपकीन, चंद्रभागा वाळवंट येथे चेंजिंग रूम उभारण्यात येत आहे. तसेच भाविकांच्या सुलभ व जलद दर्शनाला प्राधान्य दिले असून, यासाठी योग्य नियोजन करण्यात आले असल्याची माहिती मंदीर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी यावेळी दिली.

# सोलापूर जिल्ह्यात २८ फेब्रुवारी रोजी महा विधी सेवा शिबीराचे आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/जिमाका : मा. मुंबई उच्च न्यायालय तसेच महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या सुचनेनुसार आणि प्रमुख जिल्हा न्यायाधीश मा. श्री. मनोज शर्मा यांच्या निर्देशानुसार सोलापूर जिल्ह्यात दिनांक २८ फेब्रुवारी २०२६ रोजी महा विधी सेवा शिबीराचे आयोजन करण्यात येणार आहे.

या शिबिरास सोलापूर न्यायिक जिल्ह्याचे पालक न्यायमुर्ती मा. श्री. एन. जे. जमादार (मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ कोल्हापूर) तसेच न्यायमुर्ती फिरदोश पुनीवाला (मुंबई उच्च न्यायालय) उपस्थित राहणार आहेत.

शिबिराचे उद्दिष्ट

- शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांविषयी समाजात जागरुकता निर्माण करणे
- कल्याणकारी कायद्यांबाबत जनजागृती करणे
- पात्र लाभार्थ्यांना योजनांशी जोडणे व त्यांची कायदेशीर गरज समजून घेणे
- योग्य कायदेशीर सल्ला देऊन समस्या सोडविणे

शिबिरातील प्रमुख विषय

- श्रमिक/मजूर कल्याण
- दिव्यांग व्यक्तींचे प्रश्न
- बालकांशी निगडीत मुद्दे
- ट्रान्सजेंडर समुदाय
- कारागृहातील कैदी
- अनुसूचित जाती व जमाती
- जेष्ठ नागरिक
- भिकारी व बेघर व्यक्ती
- रस्ता सुरक्षा व अपघात
- नैसर्गिक आपत्तीग्रस्त
- तस्करीचे पिडीत

सदरील शिबीर जिल्हा प्रशासनाच्या समन्वयाने आयोजित करण्यात येणार असून जास्तीत जास्त शासकीय कार्यालयांनी सहभाग नोंदविणे आवश्यक आहे. शिबीर यशस्वी होण्यासाठी सर्व विभागांचे सहकार्य महत्त्वाचे असल्याचे जिल्हा विधी सेवा प्राधिकरण तथा दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, सचिव प्रशांत पेठकर यांनी पत्राद्वारे कळविले आहे.

# श्री स्वामी समर्थ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था अक्कलकोट येथे तंत्र प्रदर्शन संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था अक्कलकोट येथे आज संस्था स्तरीय तंत्र प्रदर्शन संपन्न झाला प्रथम सदर तंत्र प्रदर्शनाची सुरुवात राष्ट्रगीताने झाली व उद्धाटन संस्थेचे गटनिदेशक तथा प्रभारी प्राचार्य श्री गणेश काशीद सर यांनी फित कापून केले संस्थेत निर्धारित केलेल्या तंत्र प्रदर्शन कमिटीने सर्व स्टॉलला भेटी देऊन सदर प्रोजेक्ट जॉब मॉडेल चे निरीक्षण करून पाहणी केली. त्यानंतर संस्थेतील सर्व ट्रेड चे प्रशिक्षणार्थ्यांनी प्रत्येक स्टॉलवर भेट देऊन प्रोजेक्ट तथा मॉडेल जॉब चे पाहणी करून माहिती घेतली सदर तंत्र प्रदर्शनामध्ये आज एकूण सहा ट्रेड मधून २० विविध मॉडेल्स जॉब आणि प्रोजेक्टचा सहभाग होता सर्व ट्रेडच्या प्रशिक्षणार्थ्यांनी उत्कृष्ट असे मॉडेल जॉब बनवले होते नित्य ट्रेनिंगच्या माध्यमातून सदर मॉडेल जॉब मधून प्रशिक्षणार्थ्यांचे कौशल्य डेव्हलप झालेले दिसून येत होते सदर तंत्र प्रदर्शन करिता संस्थेचे प्राचार्य श्री हरिदास साहेब यांचे अनमोल असे मार्गदर्शन लाभले आणि स्वतः प्रशिक्षणार्थ्यांच्या स्वकल्पनेतून वेग-वेगळे मॉडेल जॉब प्रोजेक्ट बनवलेले होते सदर मॉडेल जॉब व प्रोजेक्टचे कौतुक संस्थेचे गटनिदेशक तथा



प्रभारी प्राचार्य श्री गणेश काशीद सर यांनी केले सदर तंत्र प्रदर्शन यशस्वी करण्यासाठी संस्थेचे जेष्ठ निदेशक श्री एम जी नदाफ सर श्री घोडके सर श्री वाघमारे सर श्री दिनेश मंठाळे सर श्री बगले सर श्री बोंगाळे सर श्री लेंबे सर सौ गवल मॅडम श्री बिराजदार सर श्री कोनापुरे सर श्री स्वामी सर माडेकर व संस्थेतील सर्व कर्मचारी उपस्थित होते.

# हिंद की चादर श्री गुरु तेग बहादूर साहेबजी यांच्या ३५० व्या शहिदी समागम वर्षानिमित्त जिल्हा परिषद शाळांमध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/जिमाका : हिंद की चादर श्री गुरु तेग बहादूर साहेबजी यांच्या ३५० व्या शहिदी समागम वर्षानिमित्त प्राथमिक व माध्यमिक जिल्हा परिषद शाळांमध्ये दिनांक २४ व २५ जानेवारी रोजी विविध सांस्कृतिक व शैक्षणिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमांतर्गत सर्व प्राथमिक शाळांमध्ये वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धा तसेच वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्पर्धात्मक परीक्षा घेण्यात येणार आहेत.

■ सुप्रसिद्ध गायक श्री. सतिंदर सरताज यांच्या भक्तीगीतावर आधारित एकल व समूह गायन स्पर्धा आयोजित करण्यात येईल.

■ सर्व शाळांनी एक दिवस निश्चित करून विद्यार्थ्यांच्या हातात फ्लायर्स व घोषणावाक्ये देऊन प्रभातफेरी काढण्यात येईल. यासाठी आवश्यक स्लोगन्स संकेतस्थळावर उपलब्ध करून दिले आहेत.

■ गुरु तेग बहादूर यांच्या जीवनकालावर आधारित डॉक्युमेंटरीचे प्रदर्शन शाळांमध्ये करण्यात येईल.

■ तसेच त्यांच्या जीवनावर आधारित ५० प्रश्नांची वस्तुनिष्ठ बहुपर्यायी परीक्षा प्रत्येक शाळेत घेण्यात येईल. नमुना प्रश्नपत्रिका संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

सर्व उपक्रमांची अद्यावत माहिती संबंधित संकेतस्थळावर भरावी, असे निर्देश देण्यात आले आहेत. यासाठी प्रत्येक गटशिक्षणाधिकारी व प्रशासनाधिकारी यांनी पूर्णवेळ जबाबदार अधिकाऱ्याची नियुक्ती करून शाळांकडून माहिती अद्ययावत करून घ्यावी.

राज्यस्तरीय स्पर्धेत सर्वोत्कृष्ट ठरणारे १५ विद्यार्थी व ५ संस्था यांची निवड करण्यात येणार आहे. त्यापैकी पाच विद्यार्थ्यांना मा. मुख्यमंत्री, तर पाच विद्यार्थ्यांना मा. जिल्हाधिकारी यांच्या हस्ते प्रमाणपत्र वितरित करण्यात येईल. तसेच जिल्ह्यातील सर्वोत्तम पाच संस्थांपैकी दोन संस्थांना मा. मुख्यमंत्री, दोन संस्थांना मा. पालकमंत्री व एका संस्थेला मा. जिल्हाधिकारी यांच्या हस्ते प्रमाणपत्र देण्यात येईल.

या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना गुरु तेग बहादूर साहेबजी यांच्या जीवनमूल्यांची प्रेरणा मिळून सामाजिक व सांस्कृतिक जाणीवा दृढ होतील, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

# ‘हिंद-की-चादर’ शताब्दी समागमासाठी नांदेडमध्ये आरोग्य यंत्रणा सज्ज

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नांदेड : शीख धर्माचे नववे गुरु श्री गुरु तेग बहादुर यांच्या ३५० व्या शहीदी समागम- हिंद-की-चादर शताब्दी कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर नांदेड जिल्ह्यातील संपूर्ण आरोग्य यंत्रणा सज्ज झाली असून, लाखो भाविकांच्या आरोग्य सुरक्षेसाठी अत्यंत काटेकोर, बहुस्तरीय व समन्वयित वैद्यकीय व्यवस्थापन उभारण्यात आले आहे.

२४ व २५ जानेवारी २०२६ रोजी नांदेड शहरात होणाऱ्या मुख्य सोहळ्यासाठी राज्यभरासह देशाच्या विविध भागांतून १० लाखांपेक्षा अधिक भाविक सहभागी होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर २२ ते २६ जानेवारी २०२६ या पाच दिवसांच्या कालावधीत अखंड आरोग्य सेवा उपलब्ध असणार आहे.

**१० लाखांहून अधिक भाविकांसाठी ५ दिवस व्यापक वैद्यकीय सेवा**

मुख्यमंत्री कार्यालयाच्या निर्देशानुसार सूक्ष्म नियोजन

मुख्यमंत्री कार्यालयाच्या स्पष्ट निर्देशानुसार विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर, जिल्हाधिकारी राहुल कर्डीले तसेच मुख्यमंत्री कार्यालयातील मुख्य समन्वयक डॉ. रामेश्वर नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य व्यवस्थापनाबाबत सविस्तर कृती आराखडा तयार करण्यात आला आहे. यासाठी जिल्हास्तरीय आरोग्य व्यवस्थापन समिती गठीत करून वारंवार आढावा बैठका घेण्यात आल्या आहेत.

**शासकीय-खाजगी आरोग्य यंत्रणांचा समन्वय**

या नियोजनात जिल्ह्यातील सर्व शासकीय आरोग्य संस्था, जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालय, जिल्हा परिषद आरोग्य विभाग, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय विष्णुपुरी, शासकीय आयुर्वेद महाविद्यालय नांदेड यांचा सहभाग आहे. यासोबतच नांदेड व परभणी जिल्ह्यातील महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना आणि मुख्यमंत्री सहाय्यता निधी योजनेशी संलग्न असलेली खाजगी रुग्णालयेही आरोग्य सेवा देणार आहेत.

**कार्यक्रमस्थळी अत्याधुनिक आरोग्य सुविधा**

मुख्य कार्यक्रमस्थळी दोन स्वतंत्र बाह्यरुग्ण विभाग (जझऊ) उभारण्यात येणार असून, येथे विविध तज्ज्ञ डॉक्टरांच्या माध्यमातून पुढील सेवा दिल्या जाणार आहेत.

असंसर्गजन्य आजारांची तपासणी, कर्करोग व दंतरोग तपासणी, महिलांच्या आजारांची विशेष तपासणी, मोफत वैद्यकीय सल्ला व औषधोपचार तसेच तातडीची संदर्भ सेवा व २४ तास रुग्णवाहिका सुविधा,नेत्र तपासणी, मोफत चष्मे व ज्येष्ठांसाठी सहाय्य, मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षामार्फत मोफत नेत्र तपासणी शिबिरे, गरजूंना मोफत चष्म्यांचे वाटप तसेच तपासणीनंतर गरजू ज्येष्ठ नागरिकांना काठ्यांचे वितरण केले जाणार आहे.

**मार्ग, पार्किंग व निवासस्थळी वैद्यकीय पथके**

भाविकांच्या सोयीसाठी नांदेड शहरातील प्रमुख प्रवेश मार्ग, वाहन पार्किंग क्षेत्रे, तसेच तात्पुरत्या निवासस्थळी वैद्यकीय पथके, प्राथमिक उपचार केंद्रे व रुग्णवाहिका सेवेत असणार येणार आहेत.

**जिल्हाभर विशेष आरोग्य शिबिरांचा सपाटा**

या ऐतिहासिक कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर जिल्हा, तालुका व ग्रामीण स्तरावर सिकल सेल तपासणी, रक्तक्षय (ॲनिमिया) तपासणी, क्षयरोग (टीबी) रुग्ण तपासणी, असंसर्गजन्य आजार तपासणी, बाल आरोग्य तपासणी (आर.के.एस.के.), आभा कार्ड नोंदणी, अशी विशेष आरोग्य शिबिरे मोठ्या प्रमाणावर आयोजित करण्यात आली आहेत.

**रुग्णालयांत विशेष राखीव खाटा**

आपतकालीन परिस्थितीत तत्काळ उपचार मिळावेत यासाठी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय विष्णुपुरी, जिल्हा रुग्णालय नांदेड व शासकीय आयुर्वेद महाविद्यालय येथे विशेष राखीव खाटांचे नियोजन करण्यात आले आहे.

तज्ज्ञांचे मार्गदर्शन

या संपूर्ण वैद्यकीय व्यवस्थापनासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षातील डॉ. जगदीश सकवान, डॉ. भूषण जैन व डॉ. रितेश पाटील यांचे मार्गदर्शन आणि सहकार्य आरोग्य व्यवस्थापन समितीस मिळत आहे.

**लाखो भाविकांच्या आरोग्यासाठी प्रशासन सज्ज**

हिंद-की-चादर शताब्दी समागमाच्या निमित्ताने नांदेड जिल्हा प्रशासनाने उभारलेली ही आरोग्य व्यवस्था लोकांच्या आरोग्य सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देणारी आदर्श व्यवस्था ठरणार आहे.

**जयंतराव जगताप यांचा निर्णय**

# करमाळा पंचायत समिती तसेच जिल्हा परिषद निवडणुकी मधून माजी आमदार जयंतराव जगताप गटाची माघार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

जेऊर/प्रतिनिधी : करमाळा तालुक्यामध्ये सध्या बारा पंचायत समिती गणाकरिता तसेच सहा जिल्हा परिषद गटाकरिता निवडणुका ह्या दिनांक ५ फेब्रुवारी रोजी होणार असून या निवडणुकीमध्ये चांगलीच रंगत भरली असून आज माजी आमदार जयंतराव जगताप गटाने जिल्हा परिषद तसेच पंचायत समितीच्या निवडणुकी मधून माघार घेतली आहे सदरच्या निवडणुका ह्या न लढण्याचा निर्णय माजी आमदार जयंतराव जगताप यांनी एका पत्रकार परिषदेमध्ये बोलताना व्यक्त केला

माजी आमदार जगताप पत्रकार परिषदेमध्ये बोलताना म्हणाले की सध्या राज्यभरातील राजकीय वातावरण घडूळ झाले असून या अस्थिरतेच्या राजकीय वातावरणामुळेच मी करमाळा तालुक्यातील पंचायत समिती तसेच जिल्हा परिषदेच्या निवडणुकीमध्ये कसलाही सहभाग दर्शविणारा नसून मी माझ्या कार्यकर्त्यांना विकासात्मक कामे करणाऱ्या उमेदवारालाच आपले मत द्या असा सल्ला दिला असून सध्याचे राज्यातील राजकीय वातावरण पूर्णतः दूषित झाले असल्याचे मत त्यांनी बोलताना व्यक्त केले सध्या जिल्हा परिषद तसेच पंचायत समितीच्या निवडणुकीमध्ये मी कोणालाही पाठिंबा देणार नसून यावेळेस मी या निवडणुकीपासून अलिप्त राहण्याचा निर्णय घेतला असल्याचे श्री जगताप यांनी बोलताना शेवटी सांगितले

करमाळा तालुक्याच्या राजकीय इतिहासामध्ये प्रथमताच माजी आमदार जयंतराव जगताप यांनी असा मोठा निर्णय घेतल्याने करमाळा तालुक्याच्या राजकीय वातावरणात एकच खळबळ उडाली आहे येऊ पाहणाऱ्या पंचायत समिती तसेच जिल्हा परिषदेच्या निवडणुकीमध्ये मात्र जगताप गटाचे कार्यकर्ते कोणाला आपले मतदान करणार याबाबत मात्र मोठी उत्सुकता लागली आहे

# निवडणुकीच्या अनुषंगाने सांगोला तहसिल कार्यालयात नियंत्रण व तक्रार कक्ष स्थापन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/जिमाका : मा. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या दिनांक १३ जानेवारी २०२६ रोजीच्या प्रसिध्दीपत्रकानुसार जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक - २०२६ चा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे.

त्याअनुषंगाने सोलापूर जिल्ह्यातील विविध तालुक्यांसाठी तीन निवडणूक निरीक्षकांची नेमणूक करण्यात आली असून सांगोला तालुक्यासाठी अप्पर जिल्हाधिकारी, महाउर्जा प्रकल्प, पुणे येथील अरुण आनंदकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

सांगोला तालुक्यातील निवडणूक प्रक्रियेच्या पारदर्शकतेसाठी तहसिल कार्यालय सांगोला येथे नियंत्रण व तक्रार कक्ष स्थापन करण्यात आला आहे. मतदारांना तक्रारी नोंदविण्यासाठी दूरध्वनी क्रमांक २०१८७ - २२०२१८ उपलब्ध करून देण्यात आला आहे.

ही माहिती सहा. निवडणूक निर्णय अधिकारी, जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक - २०२६ तथा तहसिलदार सांगोला बाळूताई भागवत यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे दिली आहे.